वनांचल विज्ञान केंद्र स्थापन करण्याबाबत
- धोरण व रुपरेषा..

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः बैठक-२०२५/प्र.क्र.११५/फ-१०
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १३.०८.२०२६

वाचा:- १) महसूल व वन विभाग, शा.नि.क्र. बैठक-२०२५/प्र.क्र.११५/फ-१०, दि. १७.१०.२०२५
२) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष - कॅम्पा/प्र.क्र.०८/२०२४-२५/८०, दिनांक ०८.०६.२०२६

प्रस्तावना:-

संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयाद्वारे वनांचल विज्ञान केंद्र स्थापन करण्याच्या अनुषंगाने धोरण व रूपरेषा निश्चित करण्यासाठी समितीची स्थापन करण्यात आली होती. उक्त समितीने वनांचल विज्ञान केंद्र स्थापन करण्याच्या अनुषंगाने धोरण व रूपरेषा निश्चित करण्याबाबतचा प्रस्ताव व त्यानुषंगाने कार्यान्वयन संस्थेबरोबर करावयाच्या सामंजस्य कराराचा (MoU) मसुदा शासन मान्यतेस्तव सादर केला होता.

वनांचे, वन्यजीवांचे संवर्धन व संरक्षण, तसेच मानव-वन्यजीव संघर्ष, वनात लागणारे वणवे व वनजमिनींवर होणारे अतिक्रमण टाळणे, त्यासंदर्भातील जनजागृती / शासनाच्या विविध योजनांची स्थानिकांना माहिती उपलब्ध होण्यासाठी त्याचप्रमाणे शेतीविषयक व व्यवसायविषयक प्रशिक्षण देऊन त्याद्वारे रोजगार उपलब्ध करुन, त्यांची आर्थिक व शैक्षणिक प्रगती होण्यासाठी केंद्र शासनाने निर्देशित केल्याप्रमाणे सरकारी यंत्रणा व खाजगी संस्था यांच्या सहभागातून आणि अखिल भारतीय वनवासी कल्याण आश्रम, जशपुर नगर, जि. जशपुर, छत्तीसगड यांच्या देखरेखीखाली राज्यात वनांचल विज्ञान केंद्र (VVK) स्थापन करण्याच्या अनुषंगाने धोरण / रूपरेषा निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

वनांचल विज्ञान केंद्राची व्याप्ती (VVK)

या धोरणाच्या उद्देशांसाठी, “वनांचल विज्ञान केंद्र” (VVK) म्हणजे वनक्षेत्र आणि आदिवासीबहुल भागांमध्ये प्रशिक्षण, प्रात्यक्षिके, संशोधनास साहय्य, पारंपारिक ज्ञानाचे दस्तऐवजीकरण, उपजिविका विकास आणि धोरणात्मक आधार यासाठीचे केंद्र (हब) म्हणून कार्य करण्यासाठी स्थापन केलेले प्रादेशिक स्तरावरील संस्थात्मक केंद्र होय.

२. ध्येय व उद्दिष्ट

सहभागी प्रशासन, वैज्ञानिक आधार आणि पारंपरिक ज्ञान प्रणालींचा आदर यांद्वारे लवचिक वन परिसंस्था आणि स्वावलंबी आदिवासी किंवा वनांवर अवलंबून असलेल्या समुदायांची निर्मिती करणे, हे “वनांचल विज्ञान केंद्रा”चे (VVK) ध्येय आहे.

वन-संरक्षण आणि मानव-वन्यजीव संघर्ष यांसारख्या आव्हानांचा सामना करण्यासाठी, समुदायाचे ज्ञान आणि औपचारिक वन-प्रशासन व्यवस्था यांना जोडणाऱ्या, तसेच सातत्यपूर्ण व प्रत्यक्ष क्षेत्रावर आधारित क्षमता-बांधणी व सुलभता निर्माण करणाऱ्या यंत्रणांना संस्थात्मक स्वरूप देणे, हे VVK चे उद्दिष्ट आहे.

३. वनांचल विज्ञान केंद्राची उद्दिष्ट्ये

- समुदाय नेतृत्वाखालील आणि वैज्ञानिकदृष्ट्या प्रमाणित संवर्धन व पुनर्संचयन पद्धतींद्वारे अवनत वनक्षेत्रांचे पुनरुज्जीवन करणे, ज्यामुळे परिसंस्थेची सेवा आणि पर्यावरणाचा समतोल राखणे.
- आदिवासी / वनांवर अवलंबून असलेल्या समुदायांच्या पारंपरिक पर्यावरणीय ज्ञानाचे आणि प्रथांचे दस्तऐवजीकरण, प्रमाणीकरण आणि संरक्षण करणे, तसेच सामुदायिक मालकी आणि लाभ वाटपाचे सूत्र निश्चित करणे.
- इतर वन उत्पादने, कृषी-वनिकी पद्धती आणि संबंधित उपक्रमांचे सुधारित व्यवस्थापन, मूल्यवर्धन आणि बाजारपेठ जोडणी याद्वारे शाश्वत उपजिविका वाढीस प्रोत्साहन देणे.
- नियमित प्रशिक्षण, प्रत्यक्ष अनुभव आणि प्रात्यक्षिक कार्यक्रमांद्वारे आदिवासी / वनांवर अवलंबून असलेले समुदाय, महिला, युवक आणि वन कर्मचाऱ्यांची क्षमता वाढविणे.
- जनजागृती, तांत्रिक मार्गदर्शन आणि संस्थात्मक समन्वयाद्वारे वन हक्क कायदा (FRA), पेसा (PESA), जैविक विविधता कायदा आणि इतर संबंधित कायद्यांच्या प्रभावी अंमलबजावणीस मदत करणे.
- हवामान बदल, पर्यावरणीय ऱ्हास आणि उपजीविकेच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी स्थानिक पातळीवर योग्य तंत्रज्ञानाचा वापर आणि प्रसार करणे.
- वनीकरण, आदिवासी विकास आणि संवर्धन कार्यक्रमांच्या सुधारणेस पाठिंबा देण्यासाठी क्षेत्रिय पुरावे आणि धोरणात्मक माहिती संकलीत करणे.

४. वनांचल विज्ञान केंद्राची संरचना

(१) जिल्हा पातळीवर वनांचल विज्ञान केंद्राची स्थापना करुन, या केंद्राना खाली नमूद सोईसुविधा पुरविण्याची जबाबदारी वन विभागाची असेल.

i. वनांचल विज्ञान केंद्र स्थापन करण्यासाठी योग्य जमीन उपलब्ध करून देणे.

ii. मूलभूत सोईसुविधांसह प्रशिक्षण कक्ष, निवास व्यवस्था आणि सर्व आवश्यक भौतिक पायाभूत सुविधांची निर्मिती व देखभाल करणे.

iii. CAMPA च्या वार्षिक कार्ययोजनांनुसार किंवा राज्य योजनेच्या माध्यमातून निधीची उपलब्धता सुनिश्चित करणे.

iv. प्रत्येक वनांचल विज्ञान केंद्रासाठी विभागीय वन अधिकारी / उप वनसंरक्षक यांची “नोडल अधिकारी” म्हणून नियुक्ती करणे.

v. कार्यकारी संस्थेने सादर केलेले वार्षिक कृती आराखडे, अर्थसंकल्प आणि प्रगती अहवालांना मंजुरी देणे.

vi. कायदेशीर, आर्थिक आणि कार्यक्रम विषयक बाबींचे पालन होत असल्याची खात्री करण्यासाठी तपासणी, लेखापरीक्षण आणि मुल्यमापन करणे.

vii. वन विभाग प्रशिक्षण कार्यक्रमांची प्रत्यक्ष अंमलबजावणी, कर्मचाऱ्यांची भरती किंवा वनांचल केंद्राचे दैनंदिन व्यवस्थापन यांसारखी कामे स्वतः करणार नाही. त्याकरीता सुयोग्य संचालन करणाऱ्या संस्थेची नेमणूक करण्यात येईल.

(२) वनांचल केंद्राची कार्यपध्दती

i. वनांचल विज्ञान केंद्राचे संचालन पारदर्शक प्रक्रियेद्वारे निवडलेल्या अनुभवी आणि प्रख्यात संस्था किंवा अशासकीय संस्थांमार्फत (NGO) केले जाईल.

ii. राज्याच्या वन विभागाकडे एकूण मालकी हक्क, धोरणात्मक बाबी आणि कायदेशीर नियंत्रण राहील.

iii. वनांचल विज्ञान केंद्रासाठी नियुक्त केलेली संचालन करणारी संस्था त्या केंद्राच्या संपूर्ण कार्यान्वयीन व्यवस्थापनासाठी जबाबदार असेल.

कार्यकारी संस्थेची कर्तव्ये आणि जबाबदारी:-

i. वनांचल विज्ञान केंद्राच्या दैनंदिन कामकाजाचे व्यवस्थापन करणे.

ii. कार्यालयीन आणि प्रकल्प कर्मचाऱ्यांची कंत्राटी तत्त्वावर भरती, नियुक्ती आणि व्यवस्थापन करणे.

iii. प्रशिक्षण, प्रात्यक्षिके आणि क्षेत्रीय कार्यक्रमांची आखणी व अंमलबजावणी करणे.

iv. ग्रामसभा, जैवविविधता व्यवस्थापन समित्या आणि संबंधित शासकीय विभागांशी समन्वय साधणे.

v. अर्थविषयक बाबी, अभिलेख आणि डेटाबेस यांची देखभाल करणे.

vi. वन विभागाला नियतकालिक भौतिक आणि आर्थिक अहवाल सादर करणे.

vii. अस्तित्वात असलेले कायदे, नैतिक मानके आणि CAMPA (कॅम्पा) मार्गदर्शक तत्त्वांचे पूर्ण पालन सुनिश्चित करणे.

(३) वनांचल विज्ञान केंद्राची प्रशासन संरचना

a) राज्यस्तरीय सुकाणू समिती (State Steering Committee)

१	प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर	अध्यक्ष
२	अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (महाकॅम्पा), महाराष्ट्र राज्य, नागपूर	सदस्य
३	अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर	सदस्य
४	अतिरिक्त प्रधान मुख्य वनसंरक्षक (संशोधन, शिक्षण आणि प्रशिक्षण), महाराष्ट्र राज्य, नागपूर	सदस्य
५	वनसंरक्षक / मुख्य वनसंरक्षक (प्रा),	सदस्य सचिव
६	पद्मश्री श्री. चैताराम पवार	समुदाय प्रतिनिधी
७	श्री. गिरीश कुबेर	सदस्य - कार्यकारी समिती, राष्ट्रीय कॅम्पा प्राधिकरण
८	डॉ. राहुल मुंगीकर	सदस्य - जैवविविधता तज्ज्ञ

b) जिल्हास्तरीय वनांचल विज्ञान केंद्र सल्लागार समिती

१	वनसंरक्षक / मुख्य वनसंरक्षक (प्रा),	अध्यक्ष
२	उपवनसंरक्षक	सदस्य सचिव
३	जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी	सदस्य
४	प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प	सदस्य
५	निवासी उपजिल्हाधिकारी	सदस्य
५	उपवनसंरक्षक / विभागीय वन अधिकारी (सामाजिक वनीकरण)	सदस्य
६	संचालक, वन प्रशिक्षण संस्था, पाल / प्रतिनिधी	सदस्य

c) वनांचल विज्ञान केंद्र व्यवस्थापन कक्ष (कार्यकारी संस्थेद्वारे नियुक्त)

१	प्रकल्प संचालक
२	प्रकल्प व्यवस्थापक / तांत्रिक तज्ज्ञ
३	कार्यक्रम सहाय्यक
४	प्रशासकीय कर्मचारी वृंद, डेटा विश्लेषक, लेखापाल, सहाय्यक, वाहनचालक इत्यादी)

५. वनांचल विज्ञान केंद्राची प्रमुख उद्दिष्ट्ये

(१) **क्षमता बांधणी आणि प्रशिक्षण** - वन कर्मचारी, संयुक्त वन व्यवस्थापन समित्या, स्वयंसहाय्यता गट आणि आदिवासी समुदायांसाठी प्रशिक्षण.

(२) **प्रात्यक्षिक आणि नाविन्यपूर्ण उपक्रम -**

- पुन:स्थापना, कृषी-वनीकरण, गौण वनोपज (NTFPs), बांबू आणि औषधी वनस्पतींसाठी प्रात्यक्षिक भूखंड.
- प्रायोगिक प्रकल्प आणि तंत्रज्ञान प्रात्यक्षिक.

(३) **संशोधन आणि विकास**

- विद्यापीठे आणि संशोधन संस्थांशी सहकार्य.
- पारंपरिक ज्ञानाचे दस्तऐवजीकरण.

(४) **उपजीविका संवर्धन**

- मुल्यवर्धन, बाजारपेठेशी जोडणी आणि व्यवसाय विकास.
- वनाधारित सुक्ष्म उद्योगांना सहाय्य.

(५) **विस्तार आणि लोकसंपर्क**

- प्रकाशने, डिजिटल प्लॅटफॉर्म्स आणि जनजागृती मोहिमा.
- समुदाय आणि वन कर्मचाऱ्यांसाठी सल्लागार सेवा.

(६) **देखरेख आणि मुल्यमापन**

- वनीकरण उपक्रमांच्या प्रभावाचे मुल्यमापन.
- माहिती संकलन आणि अहवाल तयार करणे.

६. वनांचल विज्ञान केंद्रासाठी निधीचा स्रोत

वनांचल विज्ञान केंद्रासाठी खालील स्रोतांमधून निधी उपलब्ध होईल:

- कॅम्पा निधी.
- केंद्र पुरस्कृत योजना.

- CSR (कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी) अंतर्गत योगदान.
- हवामान आणि जैवविविधतेशी संबंधित आंतरराष्ट्रीय निधी.

वनांचल विज्ञान केंद्रासाठी निधी वितरणाचे सूत्र

- **पायाभूत सुविधांवरील खर्च:** - सदरचा खर्च राज्य कॅम्पा अंतर्गत केला जाईल.
- **नियमित कामकाज खर्च (Revenue expenditure):-** सदरचा खर्च कार्यकारी संस्थेद्वारे, “वार्षिक मंजूर आराखडा” (Annual Plans of Operation) च्या माध्यमातून प्राप्त निधीतून केला जाईल.

  कार्यकारी संस्थेने वनांचल विज्ञान केंद्राच्या निधीसाठी स्वतंत्र बँक खाते ठेवावे, PFMS च्या नियमांचे पालन करावे, उपयोगिता प्रमाणपत्रे (Utilization Certificates) सादर करावीत आणि वार्षिक वैधानिक लेखापरीक्षण (Statutory Audit) करावे. यामधून निर्माण झालेली मालमत्ता राज्य शासनाच्या वन विभागाच्या मालकीची असेल.

७. <u>वनांचल विज्ञान केंद्राचे संचालन, मुल्यमापन आणि उत्तरदायित्व.</u>

- वन विभागाद्वारे मंजूर वार्षिक कृती आराखडा.
- वन विभागाकडे सादर करावयाचे त्रैमासिक प्रगती अहवाल.
- निवडलेल्या संस्थेद्वारे स्वतंत्र तृतीय - पक्ष मुल्यमापन.
- सामाजिक लेखापरीक्षण

सततची असमाधानकारक कामगिरी, आर्थिक अनियमितता किंवा धोरणात्मक तरतुदींचे उल्लंघन यांसारख्या प्रकरणांमध्ये, वन विभाग सुधारणात्मक उपाययोजना करेल. यामध्ये संबंधित संस्थेसोबतचा करार रद्द करण्यासारख्या कारवाईचाही समावेश असेल. तसेच, प्रचलित कायद्यातील तरतुदीनुसार योग्य ती कारवाई करण्यात येईल.

८. <u>कालावधी आणि विस्तारक्षमता</u>

- सामंजस्य कराराचा (MoU) सुरुवातीचा कालावधी: ३ वर्षे.
- कामगिरीच्या आधारे, राज्य सनियंत्रण समितीच्या शिफारशीनुसार या कालावधीत वेळोवेळी वाढ केली जाऊ शकते.

९. <u>कायदेशीर आणि प्रशासकीय तरतुदी.</u>

- वनांचल विज्ञान केंद्रे राज्य वन विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली कार्यरत राहतील.
- कार्यकारी संस्थेने सर्व वैधानिक आणि आर्थिक नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील.
- बौद्धिक संपदा आणि संकलीत होणाऱ्या माहितीची (डेटा) मालकी राज्य सरकारकडे असेल.

वनांचल विज्ञान केंद्राचे कामकाज खाली नमूद कायद्यांच्या कार्यकक्षेत राबविले जाईल:

- भारतीय वन अधिनियम, १९२७
- वन (संरक्षण व संवर्धन) अधिनियम, १९८०
- वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२
- पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६
- अनुसूचित जमाती आणि इतर पारंपारिक वननिवासी (वन हक्क मान्यता) अधिनियम, २००६
- पंचायती (अनुसूचित क्षेत्रांना विस्तार) कायदा, १९९६ च्या तरतुदी
- जैविक विविधता अधिनियम, २००२ आणि जैविक विविधता (सुधारणा) अधिनियम, २०२३
- पर्यायी वनीकरण निधी अधिनियम, २०१६
- माहिती अधिकारी अधिनियम, २००५
- केंद्र शासन व राज्य शासनाचे प्रचलित नियम, मार्गदर्शक तत्त्वे आणि कार्यकारी सूचना

या धोरणातील कोणत्याही बाबीचा अर्थ ग्रामसभा, वनहक्क धारक किंवा जैवविविधता व्यवस्थापन समित्यांचे वैधानिक अधिकार कमी करणारा, त्यावर अतिक्रमण करणारा किंवा त्यावर निर्बंध घालणारा असा लावला जाणार नाही. यामध्ये काही विसंगती आढळल्यास, संबंधित अधिनियम किंवा वैधानिक नियमांमधील तरतुदीच प्रभावी ठरतील.

१०. <u>संचालन संस्था निवडण्याची कार्यपद्धती</u>

संचालन संस्थेच्या (Operating Agency) नियुक्तीसाठी आवश्यक पात्रता अटी, निवड पद्धती आणि मंजुरी प्रक्रियेचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

या सुविधेच्या संचालनासाठी वनसंवर्धन, आदिवासी विकास आणि नैसर्गिक साधनसंपत्ती व्यवस्थापन या क्षेत्रांत प्रत्यक्ष अनुभव असलेल्या संस्थांचा विचार केला जाईल. धुळे येथील वनांलक विज्ञान केंद्र हा एक प्रायोगिक प्रकल्प म्हणून प्रस्तावित असल्याने, तत्सम कामांसाठी सूचीबद्ध (empanelled) असलेल्या कोणत्याही संस्था, स्वयंसेवी संस्था (NGO) किंवा इतर संस्था संचालन संस्था म्हणून पात्र ठरतील. तथापि, याबाबत शासन निर्णयानुसार सूचीबध्द शैक्षणिक संस्थांना प्राधान्य असेल. संचालन संस्थेच्या नियुक्तीस राज्य सुकाणू समितीची (State Steering Committee) मंजुरी आवश्यक असेल.

११. <u>कार्यालयीन आणि प्रकल्पासाठी कर्मचाऱ्यांची निवड निकष व भरती प्रक्रिया</u>

- सर्व कर्मचाऱ्यांची नियुक्ती कार्यान्वयीन संस्थेद्वारे कंत्राटी तत्त्वावर केली जाईल.

- प्रकल्प समन्वयक, विषय तज्ञ, समुदाय संघटक, लेखा अधिकारी आणि सहाय्यक कर्मचारी यांसारख्या पदांसाठी पात्रता, अनुभव आणि भूमिकांबाबतचे स्पष्ट निकष लागू असतील.
- स्थानिक आणि आदिवासी उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल.
- लिंग-समतोल आणि पारदर्शकता यांचा योग्य विचार केला जाईल.
- कर्मचारी नियुक्ती करताना बाल कामगार यांच्या नियुक्तीवर निर्बंध असतील.
- सदर कर्मचारी यांना कामगार कायद्यानुसार निश्चित करण्यात आलेले किमान वेतन अदा करणे बंधनकारक राहील.
- संबंधित कर्मचाऱ्यांचे वेतन / भत्ते / मानधन त्यांच्या बँक खात्यामध्ये धनादेशाद्वारे अथवा ऑनलाईन पद्धतीने जमा करण्यात यावेत.
- कर्मचाऱ्यांची नियुक्ती करताना त्यांचे पोलीसाकरवी चारित्र्य प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक राहील.

१२. <u>देखरेख, अहवाल आणि प्रशासन आराखडा</u>

पारदर्शकता आणि उत्तरदायित्व सुनिश्चित करण्यासाठी हा आराखडा अहवालाचे नमुने, कालमर्यादा, कामगिरीचे निर्देशक, लेखापरीक्षणाच्या आवश्यकता आणि प्रशासकीय कार्यपद्धती निश्चित करतो.

१३. सामंजस्य कराराचा (MoU) मसुदा परिशिष्ट-अ मध्ये सादर केला आहे.

१४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८१३१२३४५४१४४० असा आहे. हा निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

JITENDRA S RAMGAOKAR

Digitally signed by JITENDRA S RAMGAOKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue and Forests Dept, 2.5.4.20=DA1BD25BE62F91C7B60749717D63394F115854B1B30C0D7CDA850348D6A12577, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=067F696C19CDAEAD50B2E37C6C5A94DB09F968C45E35C16617050C2A9D057202, cn=JITENDRA S RAMGAOKAR
Date: 2026.08.13 12:35:55 +05'30'

(डॉ. जितेंद्र रामगावकर)
मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)

<u>**प्रत :-**</u>

१. मा.मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. मंत्री (वने) महोदयांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. अपर मुख्य सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
४. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर
५. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (महाकॅम्पा), महाराष्ट्र राज्य, नागपूर
६. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर

७. जिल्हाधिकारी

८. वनसंरक्षक (प्रा), धुळे

९. उपवनसंरक्षक, धुळे

१०. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी

११. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धुळे

१२. निवासी उपजिल्हाधिकारी, धुळे

१३. उपवनसंरक्षक / विभागीय वन अधिकारी (सामाजिक वनीकरण)

१४. पद्मश्री श्री. चैताराम पवार

१५. श्री. गिरीश कुबेर, वनांचल विज्ञान केंद्र राष्ट्रीय संयोजक, वनवासी कल्याण आश्रम, हितरक्षा, छत्तीसगड, प्रशासनिक कार्यालय, ३५, चंचल स्मृती, ग. द. आंबेडकर मार्ग, वडाळा मुंबई-४०० ०३१.

१६. डॉ. राहुल मुंगीकर, वनांचल विज्ञान केंद्र, राष्ट्रीय समन्वयकः जैवविविधता विशेषज्ञ व सहयोगी प्राध्यापक, डेक्कन एजु. सोसा. पुणे विदयापीठ (DESPU), पुणे

१७. निवडनस्ती (फ-१०).

ANNEXURE - "A"

MODEL MoU BETWEEN STATE FOREST DEPARTMENT AND OPERATING AGENCY FOR VVK

Memorandum of Understanding (MoU)

This MoU is entered into on [Date] between:

The State Forest Department, Government of [State],

(Hereinafter referred to as "the Department")

AND

[Name of Operating Agency], registered under [Act], having its registered office at [Address],
(hereinafter referred to as "the Implementing Agency").

1. Purpose of the MoU

The purpose of this MoU is to define the roles, responsibilities, and modalities for establishment and operation of Vananchal Vigyan Kendra (VVK) by the Operating Agency with support and oversight of the Department.

2. Scope of Work

The Operating Agency shall:

1. Establish and operationalize the VVK.
2. Provide technical framework
3. Prepare Annual Action Plans and budget.
4. Coordinate with the departments
5. Conduct training, demonstrations, and outreach programmes.
6. Implement pilot projects and innovations in forestry.
7. Promote forest-based livelihoods.

8. Maintain records, documentation, and MIS.
9. Submit periodic reports.
10. Ensure community participation and inclusiveness.

3. Roles and Responsibilities

3.1 Responsibilities of the Department

The Department shall:

1. Provide infrastructure and basic facilities.
2. Provide financial support as per approved plans.
3. Facilitate coordination with forest divisions and line departments.
4. Approve annual plans and review performance.
5. Provide technical guidance and policy direction.

3.2 Responsibilities of the Operating Agency

The Implementing Agency shall:

1. Deploy qualified human resources.
2. Ensure efficient utilization of funds.
3. Maintain transparency and accountability.
4. Follow government financial rules and procurement norms.
5. Avoid conflict of interest.
6. Ensure sustainability of interventions.

4. Financial Arrangements

1. Funds shall be released in installments based on approved action plans.
2. Utilization Certificates and audited statements shall be submitted annually.
3. The Department reserves the right to audit accounts.

5. Governance and Reporting

1. State Review Committee shall review progress annually.

2. Quarterly progress reports shall be submitted and reviewed by the District VVK advisory Committee
3. Key Performance Indicators (KPIs) shall include:
    - Number of trainings conducted
    - Number of beneficiaries trained
    - Number of field demonstrations
    - Livelihoods generated
    - Community participation
    - Innovation outcomes
    - Number of technologies/practices promoted
    - Adoption rate of practices
    - Increase in productivity/income
    - Improvement in forest/agriculture indicators
    - Livelihood diversification

6. Duration of the MoU

This MoU shall be valid for a period of [3] years, extendable based on performance.

7. Intellectual Property and Data

All data, publications, and intellectual outputs generated under VVK shall be jointly owned by the Forest Department and the Implementing Agency.

8. Ownership

- Assets created remain with the state government
- The Operating Agency acts as custodian/operator

9. Termination Clause

1. Either party may terminate the MoU with [90] days notice.
2. The Forest Department may terminate the MoU immediately in case of:

- Misuse of funds
- Non-performance
- Violation of laws

10. Dispute Resolution

Any dispute shall be resolved through mutual consultation. Failing which, it shall be subject to jurisdiction of courts at concern places.

11. Force Majeure

Neither party shall be liable for failure due to force majeure events.

12. Miscellaneous Provisions

- The Operating Agency shall not sub-contract without approval.
- Branding and communication shall follow government guidelines.
- Amendments to MoU shall be made with mutual consent.

Signatures

For the State Forest Department:

Name:

Designation:

Signature:

For the Operating Agency (NGO):

Name:

Designation:

Signature:

Date:

Place: